महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.३७४(२)/विद्युत/२०१९/१४-ब दिनांक- १ सप्टेंबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय:- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ करीता EWS प्रमाणपत्र पाठविणेबाबत.

संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०५/२०१९ व अधिसूचना क्रमांक १८/२०१९.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता, विद्युत, गट-ब, श्रेणी-२ या संवर्गाच्या १६ पदांकरीता दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. विषयांकित परीक्षेसंदर्भात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाकरीता आरक्षित ०२ पदांचा निकाल, प्रमाणपत्र तपासणीनंतर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्याबाबतचे प्रसिध्दीपत्रक यापूर्वीच दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

३. तद्अनुषंगाने विषयांकित परीक्षेच्या दिनांक १० ते ११ सप्टेंबर, २०२० या कालावधीत तसेच दिनांक २४ ऑगस्ट, २०२१ रोजी मुलाखतीस हजर असलेल्या ज्या उमेदवारांनी अर्जात सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचा (SEBC) दावा केलेला आहे, त्या उमेदवारांनी "आर्थिकदृष्टया दूबल घटक (EWS)" प्रवर्गाचा विकल्प निवडला आहे. परंतु अद्याप आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशा उमेदवारांनी "आर्थिकदृष्टया दूबल घटक (EWS)" प्रवर्गाच्या प्रमाणपत्राची प्रत आयोगाच्या examination-2@mpsc.gov.in या ईमेलवर सदर प्रसिध्दीपत्रक प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत पाठवावी.

४. अंतिम निवडीकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाकरीता विचार होण्यासाठी विकल्प निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी EWS प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

ठिकाण- मुंबई.

उपसचिव, परीक्षा-२
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.